# समीक्षा ठाकूरची राज्यस्तरीय एस.आर.डी. कॅम्पसाठी निवड



**दोडामार्ग (वार्ताहर) :** मुंबई विद्यापीठ एन.एस. एस विभागामार्फत एस.आर.डी. व एन. आर. डी. निवड चाचणी शिबिर संत राऊळ महाराज महाविद्यालय कुडाळ येथे झाले. या शिबिरातून दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातील एन.एस.एस. विभागाची विद्यार्थिनी समीक्षा शशिकांत ठाकूर हिची औरंगाबाद येथे १४ ते १६ सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या राज्यस्तरीय एस.आर.डी. कॅम्पसाठी निवड झाली. यासाठी तिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.आर.डी. देरेकर, एन.एस.एस. विभाग प्रमुख दिलीप बर्वे, डॉ. आर.एस. इंगळे यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशाबद्दल प्राचार्य डॉ. देरेकर एस.यु. संस्थेचे चेअरमन अभिजित हेंगशेट्ये व संस्थेचे सर्व पदाधिकाऱ्यांनी तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, विद्यार्थी व परिसरातील सर्वांनी तिच्या निवडीबद्दल कौतुक केले आहे.